# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## शिक्षण विभाग

दुरध्वनी क्र. 0712–2567028
EmailID:education.nmc@gmail.com

जा.क्र. 3413 /शि.वि./2016
दि. 27/12/2016

प्रति,

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
सर्व प्राथ./उच्च प्राथ./माध्य. शाळा,
महानगरपालिका, नागपूर.

**विषय :–स्वच्छता अभियान अंतर्गत स्वच्छता ॲप "जनाग्रह" मोबाईलमध्ये डाऊनलोड करून वापरण्याबाबत.**

संदर्भ :–1)गुरूवार दि.22.12.2016 रोजी सकाळी 9.00 वाजता सानेगुरूजी उर्दू माध्यमिक शाळा येथे देण्यात आलेल्या सभेतील निर्देश.
2)मा.अपर आयुक्त–1,म.न.पा., नागपूर यांचे दि.19.12.2016 चे सभेतील निर्देशान्वये.
3) कार्यालयीन परिपत्रक क्र.3356/शि.वि/2016 दि.19.12.2016

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, भारत सरकारचे स्वच्छता ॲप मोबाईलमध्ये डाऊनलोड करून वापरण्याबाबत मा.अपर आयुक्त–1,म.न.पा., नागपूर यांनी दि.19.12.2016 चे सभेत निर्देश दिले आहे. आपल्या शाळेतील सर्व शिक्षक, परिसरातील पालक यांना त्यांचे मोबाईलमध्ये स्वच्छता ॲप डाऊनलोड करून वापरावयाचे आहे. त्याचे कार्यप्रणाली आपणांस संदर्भिय कार्यालयीन परिपत्रकांव्दारे कळविण्यात आले होते. तसेच वरीलप्रमाणे कार्यवाही केल्यानंतर याबाबतची माहिती शिक्षणाधिकारी तसेच आपल्या झोनचे शाळा निरीक्षक यांच्या वॅाट्सअप क्रमांकावर पाठवावे. याबाबत अधिक माहिती देण्यासाठी गुरूवार दि.22.12.2016 रोजी सकाळी 9.00 वाजता सानेगुरूजी उर्दू माध्यमिक शाळा मुख्याध्यापकांची सभा आयोजित केली होती. यामध्ये श्री.अनित कोल्हे, समन्वयक, मो.क्र.9823144556, डॉ.उरकूडे, समन्वयक मो.क्र. 9823074729 यांच्यातर्फे मोलाचे मार्गदर्शन करण्यात आले. तरीसुध्दा याबाबत आपणातर्फे योग्य प्रतिसाद मिळालेला नाही. यामुळे मा.अपर आयुक्त–1, म.न.पा. यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

तरी आपण व आपल्या शाळेतील सर्व शिक्षकांनी उपरोक्त स्वच्छ भारत अभियान अंतर्गत जनाग्रह ॲप डाऊनलोड करून माहिती पूर्ण भरावी. व याबाबतचा अहवाल आपल्या झोनच्या शाळा निरीक्षक यांच्या वॅाट्स अप नंबरवर दररोज पाठवावा.

तसेच शालेय विद्यार्थ्यांचे पालक व परिसरातील नागरीक यांना याकरीता प्रोत्साहीत करण्यास्तव शालेय प्रार्थनेच्या वेळेस विद्यार्थ्यांना याबाबत माहिती द्यावी व या स्वच्छ भारत अभियान अंतर्गत जनाग्रह ॲप डाऊनलोड करून माहिती पूर्ण भरण्यास विनंती करावी.तसेच त्यांना काही अडचण आल्यास आपण व्यक्तीशः मदत करावी व कार्यपूर्ती अहवाल कार्यालयास सादर करावा.

(फारूक अहमद खान)
**शिक्षणाधिकारी,**
**महानगरपालिका, नागपूर**

**प्रतिलिपी :–**

1) मा.अपर आयुक्त–1 म.न.पा.नागपूर यांना सविनय माहितीस्तव सादर
2) मा.उपायुक्त–1 म.न.पा.नागपूर यांना सविनय माहितीस्तव सादर